: प्रकरण चौथे :

# रा. रं. बोराडे ह्यांच्या कथांमधील वातावरणनिर्मिती व भाषाशैली

प्रकरण चौथे :

# रा. रं. बोराडे ह्यांच्या कथांमधील वातारणनिर्मिती व भाषाशैली

## *४.१. प्रास्ताविक :*

प्रस्तुत प्रबंधिकेच्या ह्या चौथ्या प्रकरणामध्ये 'रा. रं. बोराडे ह्यांच्या कथांमधील वातावरणनिर्मिती व भाषाशैली' ह्या घटकांचा आपल्याला विचार करावयाचा आहे. कथेच्या अभ्यासात कथानक व व्यक्तिरेखा ह्या दोन प्रमुख घटकांबरोबरच वातावरण किंवा स्थल - काल परिस्थिती ह्या घटकांलादेखील अनन्यसाधारण महत्त्व आहे. ह्या घटकामुळे कथेचे सौंदर्य वाढते. वस्तुत: कथेमध्ये वातावरणनिर्मितीसाठी कथाकाराला फार मोठया प्रमाणात वाव असत नाही. परंतु कथेतील व्यक्तिरेखा ह्या विशिष्ट स्थल - काल परिस्थितीशी म्हणजेच वातावरणाशी निगडीत असतात. म्हणजेच कथेत वातावरण हा घटक अपरिहार्य असतो. वातावरण ह्या घटकाबद्दल वा. ल. कुळकर्णी म्हणतात, ''कोणत्याही विशिष्ट भूप्रदेशात विशिष्ट काळाच्या पार्श्वभूमीवर घटनाप्रसंग घडत असतात. हे स्थळकाळाचे उचित दर्शन घडविणे म्हणजेच पार्श्वभूमी किंवा वातावरणनिर्मिती होय.''[१] कथेला सजीवता प्राप्त करून देण्यात वातावरणनिर्मितीचा खूप मोठा वाटा असतो. ही वातावरणनिर्मिती कथेतील व्यक्तिरेखा आणि त्यांची कृती ह्यांच्याशी संबंधित असते. वातावरणनिर्मितीमुळे कथेला सौंदर्य प्राप्त होते. तसेच तिच्यामुळे कथेतील घटनाप्रसंग आणि व्यक्तिरेखांचे स्वभाव ह्यांच्यातील संबंध स्पष्ट होतो.

## ४.२. रा. रं. बोराडे ह्यांच्या कथांमधील वातावरणनिर्मिती :

'पेरणी' (१९६२) व 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या दोन कथासंग्रहांमधील स्थलकालाधिष्ठित, कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक इ. पार्श्वभूमीतून वातावरण आपल्या समोर येते. वातावरणनिर्मितीसाठी पार्श्वभूमी म्हणून आधारभूत ठरलेल्या ह्या घटकांच्या माध्यमातून कशा प्रकारे वातावरणनिर्मिती होते, हे आपण आता पाहू.

### *४.२.१. कौटुंबिक वातावरण :*

बोराडे ह्यांच्या कौटुंबिक वातावरण चित्रित करणाऱ्या अनेक कथा आहेत. पैकी 'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'हुरडा' ही कथा त्यांच्या कथासंभारात विशेष लक्षणीय ठरते. कौटुंबिक ताणतणाव व निसर्गाच्या माध्यमातून येथे वातावरणनिर्मिती साधली आहे. किंबहुना निसर्गाला येथे

स्वतंत्र स्थान प्राप्त झालेले आहे. ग्रामीण कुटुंब म्हटले की, ग्रामसंस्कृती, शेती, शेतीशी निगडीत घटक आलेच. ग्रामीण कुटुंबाला एकत्र कुटुंबपध्दतीचे अधिष्ठान लाभलेले असते. अधिक माणसे म्हणजे अधिक चांगली शेती हे ग्रामीण माणसाचे गणित असते.म्हणूनच मुलामुलींची लवकर लग्ने करण्याची आणि विवाहित मुलीला ऋतुप्राप्ती झाल्यानंतर तिच्या नवऱ्याची थट्टा करण्याची प्रथा दिसून येते. ह्या पार्श्वभूमीवर 'हुरडा' ही कथा निसगवर्णनातून सुरूवात करून ग्रामवास्तवाचेच चित्रण करते... सकाळ झालेली आहे. रानात पिके उभी आहेत. ही पिके राखणीला आल्याने जिकडे तिकडे राखणदारांच्या कोलाहलाने राने नुसती गजबजली आहेत. मात्र 'पायाची अढी टाकून' बाजी अजुन तसाच झोपलेला आहे. झोपेतून उठलेल्या बाजीची मनोवस्था किंचितशी भांबावलेली आहे. ह्याच वेळी आपला पटका जागेवर नसल्याची त्याला जाणीव होते. अशा प्रकारे येथे निसर्गवर्णनातून वातावरण निर्माण करण्यात ह्या कथेला कमालीचे यश आलेले दिसते. तसेच संवादातून वातावरण एका शब्दात पकडण्याची ताकदही येथे प्रत्ययास येते. बाजीच्या बायकोचे वयात येणे व त्याचा पटका चोरून ठेवला जाणे, ही घटना तशी किरकोळच. पण त्या कुटुंबाचे भावजीवन फुलविणारी ती घटना ठरते. अशा प्रकारे निसर्गवर्णनातून वातावरण निर्माण होत असताना व्यक्तिरेखांच्या मन:स्थितीची कल्पना वाचकाला येते. ह्या कथेतील वातावरणनिर्मितीमुळेच ह्या कथेस विलक्षण परिणामकारकता प्राप्त झालेली जाणवते.

### *४.२.२. सामाजिक वातावरण :*

'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'खानदान' ह्या कथेमधून समकालीन वातावरण, घराण्याची परंपरा, रीतिरिवाज, रूढी व मानपानाचा राग बुजुर्गमंडळी खानदानावर कसा काढतात, हे येथे तात्काळ दिसते. ह्या कथेतील वातावरण निर्मिती एका लग्नमंडपापासून सुरू होते व संपते ही ह्याच घटकापाशी. ह्या कथेतील खानदानी घराण्यातील कमाचे लग्न तेवढयाच तोलामोलाच्या खानदानातील जयसिंग्याबरोबर ठरते. लग्न दिवस उजाडतो. काही मिनिटांचा लग्नाला अवधी असताना नवरदेव 'मुलगी लंगडी आहे म्हणून पसंत नाही' असे म्हणू लागतो. मग त्याला मांडवात नेले जाते. कमाला तेथे आणून चालायला लावले जाते.त्याच्यापुढे जाऊन जयसिंग्या नवरीच्या मांडीवर डागलेले आहे, तेवढे लुगडे वर करून दाखवा, असे म्हणताच कमा भडकतेच.ती आक्रमक पवित्रा घेऊन म्हणते, "... दादा, ह्येनला सांगा, तुमच्या संगं लगीन करायचं न्हाई म्हणावं मला -आल्या वाटेन वापस जा म्हनावं ह्यानला."[२] परंतु पुढे अशा प्रकारचे वातावरण, तिचा आक्रमक पवित्रा, तिचा क्षोभ सरंजामी खानदानी मर्यादेत पूर्णपणे विरून जातो आणि खानदान जपण्यासाठी मनावर दगड ठेवून ती बोहल्यावर चढते. येथे बऱ्याचदा व्यक्तिरेखांच्या मनाचे भावविश्व साकार करणारे वातावरण येते. अशा मंगल प्रसंगी होणारी धावपळ डोळयांसमोर उभी राहते ती त्यातील वातावरणनिर्मितीच्या कौशल्यामुळेच.

### ४.२.३. *राजकीय वातावरण :*

'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या कथासंग्रहामधील 'काळीज', 'वेस' आणि 'पोतेरा' ह्या कथांमधून गल्लीतील राजकारणापासून ते कारखान्याच्या चेअरमनपदापर्यंत व जि.प. पंचायत समिती सदस्यापासून विधान सभेपर्यंतच्या राजकीय वातावरणनिर्मिती कौशल्याचा प्रत्यय येतो.'काळीज' मध्ये जयवंतराव जि. प. च्या निवडणुकीत प्रचंड मते मिळवून निवडून येतात.पण पैसा व गुंडागिरी ह्यांच्या जोरावर दादासाहेब त्यांना बंगल्यावर नेऊन नजरबंद करताता. ह्या कथेतून निवडणुकीसाठी करावी लागलेली धडपड, द्यावी लागलेली आश्वासने, कराव्या लागलेल्या युक्त्या व निवडून आल्यानंतर ठरल्याप्रमाणे नेहमीचेच मेंबर उचलून कोठेतरी नेणे, अशा प्रकारचे वातावरण निवडणुकीचे तंतोतंत चित्र आपल्या समोर उभे राहण्यास मदत करते. एकीकडे निवडून आल्याचा आनंद जयवंतरावला आहे. तर दुसरीकडे जयवंतरावला उचलून नेहण्यात दादासाहेबांना आनंद वाटतो. ह्या सर्व प्रकारामध्ये जयवंतराव शेवटी कंटाळतो व उद्वेगाने म्हणतो, ''हात् तुमच्या आयला तुमच्या राजकारणाच्या..... हा घ्या माजा राजीनामा अन् हितनं काळं तोंड करा. पुना हिकडं फिरकलाव तर खबरदार.''[३] निवेदनाच्या आणि संवादाच्या अशा वापरामुळे संबंध राजकीय वर्तुळ व तेथील वातावरण आपल्या दृष्टीसमोर उभे राहते. अशा संवादातून वेळोवेळी बदलणारी नेतेमंडळी त्यांच्या वर्तनातील बदलासह कळून येण्यास हे वातावरण मदतच करते.

असेच काहीसे वातावरण ह्या कथासंग्रहामधील ''वेस'' व ''पोतेरा'' ह्या कथांमधून दिसते. 'वेस' ह्या कथेतील गावचा पाटील रंगनाथराव व गावच्या ग्राम पंचयतीचा मेंबर केरबा ह्या दोघांभोवतीचे राजकीय डावपेच आणि वातावरण फुलविण्यात ह्या कथेला मोठे यश प्राप्त होते. गावातील केरबा महार हा केवळ दोन मतांच्या जोरावर पडकी 'वेस' पाडण्याची भाषा करतो. पण जेव्हा ग्राम पंचायतीची मिटिंग बोलावली जाते, तेव्हा केरबाचा हा निर्णय रंगनाथराव हाणून पाडतात. ग्राम पंचायतीवर अविश्वासाचा ठराव आणून ग्राम पंचायत 'बॉडी' बरखास्त करतात. अशा प्रकारचे गावाचे राजकारणाशी संबंधित वातावरण हे ह्या कथेतून एखाद्या चित्रपटाप्रमाणे समोरून सरकताना दिसते. त्यात कौशल्य आहे ते वातावरणनिर्मितीचे. हे कौशल्य बोराडे लीलया पेलताना दिसतात. म्हणूनच त्यांच्या राजकीय कथांना भरगच्च यश लाभलेले दिसते.

बोराडयांनी ह्या कथेतील निवेदनकौशल्याचा आणि संवादाचा राजकीय वातावरणनिर्मितीसाठी कसा वापर केला, ते पुढील संवादामधून लक्षात येते: ''रंगनाथराव काही क्षण थांबले. केरबाची समजूत घातल्यावानी म्हणाले, 'केरबा, आरं माज आयीक. असल्या ठरावाबिरावाच्या भानगडीत पडू नगंस,

आपुन ह्या गावाचा सरपंच व्हऊ, असं तुला सपनात बी वाटलं नसलं. आमी तुला सरपंच केलाय. आमी सांगू, तसं वाग. तुला आमी कायबी कमी पडू देनार न्हाई.''[४]

''पोतेरा'' ह्या कथेमधून साखर कारखाना आणि त्यामधील राजकारण ह्या संदर्भातील वातावरण सुरूवातीलाच येते. त्यामुळे ही कथा उत्तरोतर फुलत जाते. साखर कारखान्याचे चेअरमन आबासाहेब साबळे ह्यांना विधान सभेचे तिकीट जाहीर होते. मग आश्वासनांची ते जनतेसमोर खैरात सुरू करतात. पुढे ते विधान सभेची निवडणूक लढवितात, ह्या निवडणुकीत ते सर्वसामान्यांचा वापर करून घेतात. ह्या राजकीय घडामोडींमध्ये सर्वसामान्यांची मात्र त्रेधातिरपीट होते. ह्या सर्व घडामोडींमधून गेलेला सर्वसामान्यांचा प्रतिनिधी म्हणता येईल असा सूर्याजी आबासाहेब साबळयांकडे नोकरी मागण्यासाठी जेव्हा कारखान्याच्या ऑफिसमध्ये जातो, तेव्हा आबासाहेब साबळे म्हणतात, ''आमच्या आमदारकीच्या निवडणुकीत तुमच्यावर सोपवलेली जबाबदारी तुम्ही येवस्थित पार पाडली, तर आम्ही तुम्हाला आमच्या कारखान्यावर एक खास नवकरी देऊ.''[५] बोराडयांच्या अशा राजकीय कथा वर्तमान राजकारणाबरोबरच त्यात गुंतलेल्या माणसांच्या मनाचाही विलक्षण वेध घेताना दिसतात. ही सर्व माणसे जरी मध्यमवर्गीय वातावरणातील असली, तरी त्यात ही वैविध्यता आढळते. त्यांची मानसिकताही वेगवेगळी आहे.

### *४.२.४. धार्मिक वातावरण :*

'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'झाड' ह्या कथेमधून धार्मिक वातावरणाची छाप वाचकांच्या मनावर पडते. अंधश्रध्देबरोबर धार्मिक वातावरण वाचकांच्या मनावर बिंबून ही कथा अधिक अर्थपूर्ण बनते. तारूण्याच्या सरत्या समयापर्यंत ग्यानाकाकांना मूल होत नाही. म्हणून ते सतत खंत करीत दैवावर नाराज झालेले असतात. त्यांचे उध्वस्त अनुभवविश्वच येथे जाणवते. परंतु उत्तरोतर ही कथा धर्मिकतेकडे झुकते व एक दिवस अचानक 'नरसोबा' काकांच्या स्वप्नात येतो आणि म्हणतो, ''मी तुझ्या शेतात आलोय, उन्हात तळाया लागलोय, मला तू सावली कर, मी तुझा वंश वाढवीन.''[६] काका सकाळीसकाळी हे स्वप्न घरातील सगळयांना सांगतात. प्रचिती म्हणून ते चारीकडा शेत धुंडाळतात आणि त्यांना खरोखरच 'नरसोबाची' मूर्ती मिळते. मग क्षणाचाही विलंब न करता एक 'लेकुरवाळा ब्राम्हण' बोलावून त्याच्या हातून ते नरसोबाची प्रतिष्ठापना करतात. थोडयाच दिवसात घरात गोड बातमी ऐकायला मिळते. घरात श्रीरंग्याचा जन्म होतो. येथे बोराडे माणसाच्या मनाचा विलक्षण वेध घेताना दिसतात.

श्रध्दा आणि अंधश्रध्दा अशा दोन्ही वातावरणात घडत जाणाऱ्या कथा म्हणून 'सांगावा' व 'झाड' ह्या दोन्ही कथांचा उल्लेख करता येईल. 'सांगावा' ही पूर्ण कथा अंधश्रध्देतून जन्माला येते. यंकाचा बाप तुका हा भूतकाळात वावरताना दिसतो व अंधश्रध्देवर जबरीविश्वास ठेवून जगत असतो. यंकाने कावळयाची लागन पाहिल्यानंतर आपल्या घरावर काही अरिष्ट ओढवले, ह्या भीतीने तुकाला रूढीने घालून दिलेले काही संकेत पाळावे वाटतात. त्यातूनच तो येदा महारामार्फत 'सारस्याला' निरोप धाडतो. अंधश्रध्दा ह्या समाजात कशा खोलवर मुळे पसरून बसलेल्या आहेत, हेच ह्या कथेतील वातावरणातून दिसून येते. ह्या कथेतील व्यक्तिरेखांच्या तोंडचे संवाद सदर वातावरण वाचकांच्या डोळ्यांसमोर साक्षात उभे करतात. पहा: माहेरचा म्हार दारात पाहून गुजानं विचारलं, ''काय झालं, येदा, गप्प का?' 'मायबाप, सांगुनी ते सांगायचं आलंय', 'काय झालं?', 'येंकटरावासनी पान लागलीया.''[७] अशा प्रकारे ही संपूर्ण कथाच अंधश्रध्देच्या वातावरणात फुललेली दिसते.

काहीसे असेच अंधश्रध्देला बिलगून असणारे व धार्मिकतेशी जवळीक साधणारे वातावरण 'झाड' ह्या कथेमधून पहावयास मिळते. येथे अंधश्रध्देपोटी दैवावर व देवावर श्रध्दा ठेवली जाते. त्यामुळे ह्या कथेतील हे घटक एकाच वेळी श्रध्दा आणि अंधश्रध्दा ह्या दोन्ही प्रकारच्या वातावरणातून निर्माण होतात व कथेला अधिक रंजक बनवतात.

### ४.२.५. *बालमनाच्या चमत्कारिकपणातून निर्माण होणारे वातावरण :*

बोराडे ह्यांच्या कथासंभारात कृषिशी निगडीत विविध घटक जसे अपरिहार्य आहेत, तशा व्यक्तिमनाच्या विविध अवस्थाही अपरिहार्य असतात. त्यांच्या बहुतांश कथांमधील व्यक्तिरेखांच्या चित्रणात बालमन व त्याचे चमत्कारिक वागणे अतिशय परिणामकारकपणे येते. त्या दृष्टीने 'अभ्यास', 'सांगावा' व 'झाड' ह्या कथा विशेषत्वाने पाहण्याजोग्या आहेत. केवळ बालमनाचे चित्रण करावयाचे म्हणून बोराडे हे चित्रण करीत नाहीत, तर त्यांनी अनुभवलेल्या त्यांच्या आकलनाच्या ग्रामविश्वाच्या अनुषंगाने अगदी अपरिहार्यपणे येणाऱ्या बालकांच्या जीवनाचे चित्रण ते करीत जातात.

'अभ्यास' ह्या कथेमधील विधवा स्त्रीला आपला एकमेव आधार असलेल्या सोन्याने खूप शिकावे, मोठे व्हावे, आपला पांग फेडावा, असे वाटत असते. मात्र हा सोन्या अतिशय खोडकर निघतो. तो शाळेत जाताना बाबुशाला, आडवा पाय घालून पाडतो, तर खेळातल्या म्होरक्याला 'तिकडं काय आलं', म्हणून वेडावून पळ काढतो. त्याच्या ह्या युक्त्या - प्रयुक्त्या म्हणजे लहान मुलांच्या समूहमनाचा एक पैलूच होय. हा पैलू बोराडे ह्यांची ही कथा समर्थपणे फुलविते ती केवळ वातावरणनिर्मितीमुळेच ह्या सोन्याचे चमत्कारिक वागणे दाखविताना ह्या कथेतील वातावरण वाचकाला

थेट त्या प्रसंगापर्यंत नेऊन पोहोचविते. सोन्या खेळातील म्होरक्याला चुकांडा देऊन लपत-छपत थेट सोठाच्या मोरीजवळ जातो. तेथे नेमकी सोठाची बायडी न्हात असते, ह्या बायडीने आता शाळा सोडलेली असते. तिच्या शाळेत न येण्याबद्दल सोन्या आईला विचारतो, तेव्हा ती आता 'शानी' झाली, असे आई सांगते. अर्थात 'शानं' होणे म्हणजे काय, हे त्याला कळत नाही. त्याला कळते ते एवढेच की, ती रस्त्याने चालताना कडेकडेने चालते, साबणाच्या फेसावानी हसते.[८]

अशा प्रकारचे वातावरण 'सांगावा ' आणि 'झाड' ह्या कथांमधून ही आलेल आहे. ते आपण आधीचा मुद्दा जाणून घेताना पाहिले आहेच.

कथेचा अभ्यास करताना कथानक व्यक्तिरेखा ह्या घटकांबरोबरच वातावरण किंवा स्थल - काल परिस्थिती ह्याही घटकांला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विशिष्ट घटना-प्रसंगातून कथा घडत असताना ह्या घटना विशिष्ट स्थळी व काळी घडत असतात. म्हणजेच वातावरणनिर्मितीमध्ये स्थळाला आणि काळाला महत्त्व असते. 'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'सत्यानाश' ही कथा स्वातंत्र्यपूर्ण काळातील निझामी राजवटीचा काळ वाचकांसमोर उभा करते.[९] त्यावेळी संपूर्ण मराठवाडा हा हैद्राबाद संस्थानाच्या अंकित होता व रझाकारमंडळी खेडयापाडयातील हिंदूंना खूपच त्रास देत होती.

अशाच स्थलकालनिश्चितीचा बाज बोराडे ह्यांच्या 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या कथासंग्रहातील 'कणसं आणि कडबा' ही कथादेखील राखताना दिसते.[१०] ही कथा स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तीस - चाळीस वर्षांच्या कालखंडात लिहिली गेली आहे. ह्या कथेत बदलती खेडी, बदललेला शेतकरी व बदलते ग्रामविश्व डोळयासमोर उभे राहते. इंग्रजांबरोबर रझाकाराच्याही बेडया तुटतात आणि मराठवाडयातील शेतकरी सुटकेचा श्वास घेतो. तो स्वत:च्या न्याय्य मागण्यांसाठी शासनदरबारी संघर्ष करताना दिसतो. येथे स्थलकालाचा विचार करता, स्थल जरी तेच म्हणजे मराठवाडा हेच असले, तरी कालखंडात मात्र कितीतरी चढउतार झालेला आहे. शिवाय बोराडयांच्या कथालेखनातही खूप बदल झालेला आहे.

अशा प्रकारे रा.रं. बोराडे ह्यांच्या 'पेरणी' (१९६२) व 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या दोन कथासंग्रहांमधील वातावरणनिर्मितीचा अभ्यास केल्यानंतर हे लक्षात येते की, बोराडयांची लेखणी योग्य पध्दतीने वातावरणनिर्मिती करण्यात यशस्वी ठरली आहे. स्थलकाळानुरूप अशा विविध प्रकारच्या वातावरणामुळे कथानकाच्या दृष्टीने अनेक हेतू साध्य झालेले आहेत. एकंदर कथेच्या घटकांमध्ये वातावरणनिर्मितीला असलेले महत्त्वही लक्षात येते.

## ४.३. रा. रं. बोराड्यांच्या कथांमधील भाषाशैली :

कोणत्याही साहित्यकृतीचा अभ्यास करताना भाषाशैलीदृष्ट्या अभ्यास हा अपरिहार्य ठरतो. कारण भाषेच्या माध्यमांतून कथेचा आशय अधिक परिणामकारक ठरतो. भाषेचा असा परिणाम साधण्यासाठी लेखक स्वत:ची अशी शैली निर्माण करतो. किंबहुना तो जे लिहितो, त्यातून त्याची स्वत:ची अशी भाषाशैली अभिव्यक्त होत असते. कथेतील भाषा ही अनेक प्रकारचे कार्य करत असते. विविध भावनांचे आदानप्रदान करणे, भावभावनांचे प्रकटन करणे, व्यक्तिरेखांचे व्यक्तिमत्त्व साकार करणे, विविध संदर्भ देणे इ. अनेक प्रकारचे कार्य कथेतील भाषा करीत असते. येथे आपणास रा. रं. बोराडयांची भाषाशैली 'पेरणी' (१९६२) व 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या दोन कथासंग्रहांच्या अनुषंगाने अभ्यासावयाची आहे.

मराठी ग्रामीण कथेच्या क्षेत्रात गेल्या तीस - चाळीस वर्षांपासून लेखन करीत असलेल्या रा.रं.बोराडे ह्यांचे कथालेखन पाहता, ते प्रामुख्याने ग्रामीण जीवनचित्रण करणारे लेखक आहेत, हे सहजासहजी लक्षात येते. हे ग्रामीण जीवन त्यांच्या कथेतून परिणामकारक कसे होते, त्यांच्या व्यक्तिरेखांचे स्वरूप कसे आहे, त्यांच्या मनोविश्वाचे दर्शन ते कसे घडवितात, त्यांची निवेदनाची पध्दती कोणत्या स्वरूपाची आहे, त्यांच्या भाषाशैलीचे स्वरूप काय, ह्यासारखे अनेक प्रश्न निर्माण होतात. एकूणच त्यांच्या कथेचे स्वरूप आणि तिची सामर्थ्ये तपासून पाहताना आपणास त्यांनी योजलेली भाषा पाहणे अगत्याचे ठरते.

ग्रामीण कथेचे भाषा हे एक महत्त्वाचे अंग आहे. ग्रामीण बोली ही ग्रामीण माणसाच्या जीवनाच्या अभिव्यक्तीचे एक साधन आहे. भाषा ही जशी मानवी भावभावनांचे प्रकटन करीत असते, त्याचबरोबर भाषेतून विचारांचा वारसा पिढयान् पिढया संक्रमित होतो. भाषेतून सांस्कृतिक भेद कळतात, संस्कृतीची व काळाची माहिती मिळते. ह्या दृष्टीने भाषाशैली म्हणजे काय हे भालचंद्र नेमाडे पुढील व्याख्येतून स्पष्ट करतात, "एखाद्या द्रव्याला विशिष्ट माध्यमाद्वारे विशिष्ट रूपामध्ये प्रकट करण्याकरिता वापरलेल्या तंत्रसमुच्चयाची पध्दती म्हणजे भाषाशैली."[११]

बोराडे दाहक वास्तवाच्या प्रकटीकरणासाठी आपल्या भाषेवर कोणतेही आवरण घालू इच्छित नाहीत. खेडयात बोलली जाणारी भाषा नागर माणसाला अशिष्ट वाटेल, परंतु ग्रामीण अनुभवाच्या प्रकटीकरणासाठी बोराड्यांना ती आवश्यक वाटल्यामुळे ते तीच भाषा वापरताना दिसतात. कारण नागर माणसाला काय रूचते आणि काय रूचत नाही, त्या ही पेक्षा आपल्याला आलेले अनुभव कोणत्या भाषेत प्रकट करता येतील, ह्याच्याशी ते अधिक प्रामाणिक असतात. बोराडे नागर रसिकांशी कोणतीही तडजोड करीत नाहीत. त्यामुळे कलावंत म्हणून ते श्रेष्ठ ठरतात. नरहर कुरुंदकर 'वानवळा' ह्या

कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत म्हणतात, ''लेखक ज्या जीवनक्षेत्रातील अनुभव प्रकट करीत असतो, त्या जीवनक्षेत्राची म्हणून जी भाषा अगर बोली असते, ती त्या कलाकृतीमध्ये अवतरणे आवश्यक असते; नव्हे अपरिहार्य असते. त्याशिवाय त्या जीवनानुभवाचा प्रत्यय सर्वार्थाने येऊच शकत नाही. ग्रामीण कथेचा सगळा जिवंतपणा तिच्या बोलीशी निगडित असतो.''[१२] ही बोली म्हणजे ग्रामीण लोकांच्या मुखात बसलेले शब्दच असतात व ह्या शब्दांचे बोली भाषेतील स्थान अनन्यसाधारण असेच असते.

मराठवाडयात प्रचलित असलेले शब्द हे मराठवाडी ग्रामीण कथेचे सर्वस्व नव्हे; तर त्या शब्दांबरोबर म्हणी, वाक्प्रचार, अलंकार ह्यांनाही विशेष महत्त्व असते. भाषेला ग्रामीण जीवनातील संवादाची एक विशिष्ट मांडणी असते व ह्या सर्वांमधून ग्रामीण मन व ग्रामीण बोली व्यक्त होत असते. ह्या मनाच्या आशा निराशा, त्याची दु:खे, कढ, अनुभव घेण्याची व विचार करण्याची पध्दत हा ग्रामीण जीवनातील भाषाशैलीचा सर्वात मोठा भाग आहे. स्वत:ला ग्रामीण कथाकार म्हणणाऱ्यांना बोलीतील शब्दांबाबत खूप यश मिळते. म्हणी, वाक्प्रचार, अलंकार व वातावरणनिर्मितीतही ते यशस्वी होतात. पण मनाचे वास्तव चित्र येऊ लागले की, त्यात कथाकाराचे शहरीपण मधूनमधून डोकावू लागते. ह्याला जे सन्माननीय अपवाद आहेत, त्यात रा. रं. बोराडे ह्यांचे नाव आवर्जून घ्यावे लागते. व्यक्तिरेखांच्या मनोविश्वाच्या प्रकटीकरणाला अनुकूल असणारी भाषा जशी येते, तशीच जीवनाचा नेमका वेध घेणारी बोराडयांची दृष्टीही 'बोचकं' ह्या कथेमधून प्रकट होणाऱ्या भाषेमुळे प्रत्ययाला येते.[१३] म्हणून 'बोचकं'-मधील भाषा अनुभवाचा वेध घेणारी आहे, असे दिसून येते.

रा. रं. बोराडे आपल्या साध्या व सरळ निवेदनातून अनुभवाचे नेमकेपण हेरत जातात. अनुभवाचे नेमके रूप, नेमका आवाका त्यांच्या भाषाशैलीतून प्रकट होताना दिसतो. नेमके रूप हेरून त्यानुसार निवेदनाची जडणघडण करीत जाणे, ही त्यांची पध्दती आहे. म्हणून विनोदी निवेदन विनोदनिर्मितीला, तर ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणाऱ्या कथांमधून येणारी निवेदने ग्रामीण जीवनाचे प्रकटीकरण करणारी असतात. 'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'सत्यानाश' ह्या कथेमधून बाबालाल ह्या मुसलमानाने सरळमार्गी गावकऱ्यांवर केलेला अन्याय व अत्याचार ह्या अनुभवविश्वाचा वेध घेताना प्रकटलेली ह्या कथेतली निवेदनाची भाषा व संवाद हे ह्या दृष्टीने लक्षात घेण्याजोगे आहेत. पहा: आजीच्या हातून तपकिरीची डबी गळून पडली. ती पटकन् उठली अन् तरातरा चालत डहाळजच्या रोखानं गेली. आण्णा तिथं झोपलेले होते. त्यांना जागं करीत ती घाबऱ्या स्वरात म्हणाली,

''रंगा, अरं रंगा, उठरं, बाळा !''

''काय गं आये, काय झालं?,''

घाबरून उठत आण्णा म्हणाले,
"घात झाला, पोरा. बाबालाई रावळ्या
धरलाय्. लई माराया लागलाया म्हनं.
गंगू आलीया सांगायला. लगूलग जा अन्
तेवढं गोरं बाळा सोडवून."[१४]

चारदोन वाक्यांमधून प्रसंगाचे चित्र समोर उभे करण्याचे सामर्थ्य बोराडयांच्या भाषाशैलीचे खास वैशिष्टये आहे. प्रसंगाची गंभीरता जाणून घेण्याची लोकांची उत्सुकता, त्यातून निर्माण झालेला ताण हा एकीकडे; तर दुसरीकडे तो ताण संपल्यामुळे निर्माण झालेला आनंद ह्या दोन्ही बाबी लक्षात घेऊन त्यांच्या कथेतील विनोदाची निर्मिती झाली आहे. येथे हे निवेदन नुसते निवेदन असत नाही, तर अनेकविध संदर्भांचे सूचन करणारे ते असते. निवेदनातील प्रत्येक शब्दाशब्दामधून विविध अशा अर्थच्छटा, भावच्छटा प्रकट झाल्या आहेत. म्हणजे अनुभवाचा साक्षात्कार करील असेच निवेदन व भाषा असायला हवी, ही बोराडे ह्यांची जाणीव अतिशय सूक्ष्म आहे. म्हणूनच त्यांचे निवेदन आणि भाषाशैली अतिशय सूक्ष्म व आशयसंपन्न होऊन जाते. बोराडे ह्यांच्या कथालेखनाचे हेच खरे सामर्थ्य आहे.

बोराडयांच्या निवेदनाच्या संदर्भात आणखी एक बाब नोंदविणे आवश्यक वाटते. ती म्हणजे त्यांची निवेदनाची सहज सुंदर व ओघवती भाषा. ही भाषा ग्रामीण बोलीची प्रचीती देणारी असते. नागर शब्द येथे येणारच नाहीत, असे नाही पण नागर शब्दांचे नागरपण येथे नष्ट होऊन संपूर्ण भाषा ग्रामीण बोलीच्या स्पर्शाने उजळून निघालेली दिसते. कोणत्याही साहित्याचे मूल्य हे त्या समाजातील जीवन, वास्तव आकलन, तसेच त्या साहित्यातील भाषा प्रत्यक्ष अस्तित्वात आहे की नाही, ह्यावर अवलंबून नसून त्या साहित्यातून, त्या कलाकृतीतून भाषेच्या द्वारा जो एकूण मानवी मनाचा पट उलगडलेला असतो, त्या साहित्यातील निवेदनामधून मानवीमनाचा, मानवी अंत:करणाचा जो धांडोळा घेतला जातो, जी त्या मनाची मूलभूत स्पंदने तिथे अविष्कृत झालेली असतात, ह्यावर अवलंबून असते. म्हणून, "ग्रामीण भाषा ही त्या ग्रामीण परिसरातील जीवनाची लोकभाषा असते", हे आनंद यादवांचे म्हणणे खरे वाटू लागते.[१५] बोराडयांच्या समकालीन कथाकारांपैकी क्वचितच एखाद्या ग्रामीण कथाकाराच्या भाषेत हे सामर्थ्य आढळून येते. बोराडे ह्यांनी भाषेसंबधी केलेला हा प्रयोग ग्रामीण साहित्याची परंपरा समृध्द करणारा आहे. 'अवर्षण' ह्या कथेतील निवेदन काही अंशी अशा स्वरूपाचे आहे.[१६] गावाला कोरडया दुष्काळाने वेढले असताना पिण्याच्या पाण्यापासून अन्नधान्यापर्यंतच्या व

चाऱ्यापासून गुराढोरांच्या पाण्यापर्यंतच्या समस्यांनी गावकरी कसे हैराण होतात, हे पुढील संवादातून दिसून येते:

"मानकराच्या वाडयाला आग लागलीया. पाण्याचा टँकर तिकडं घ्या", तर ह्याला विरोध करीत मगन, "गावात तांब्याभर पानी न्हाय, लोक सकाळधरनं पान्यापायी तरसाया लागलेत." ह्यावर उपाय म्हणून अण्णारावाचे निवेदन व त्यांनी वापरलेली भाषा येथे महत्वपूर्ण ठरते, ते: "आपलं व्हईल काय तरी." त्यावर मगन, "हमेस्या आपलं कायतरी कसं व्हतंय. समदं गाव पाण्यापाई वणवण फिरत व्हतं. तवा का त्याला तसं वाटलं नाही." "त्याचा इचार करायची येळ नव्हं, त्याच्या घराला आग लागलीया." ह्यावर मगनचे निवेदन व त्यातून दिसणारी भाषा काळजाला भेदून जाणारी आहे, ते: "आमच्या बी पोटात आग पेटलीया. अस्या हालतीत आमी पाण्याचा टँकर हितनं हालू देनार न्हाई." असं म्हणून मगन टँकर ड्रायव्हरजवळ येतो. ओरडल्यासारखा तो त्याला म्हणतो, "ड्रायव्हरसायेब, बगताव काय, सोडा हिरीत पाणी."[१७] अशा प्रकारचे संवाद व त्याची भाषा सर्व प्रसंग वाचकासमोर मांडून त्यांची मने गहिवरून सोडतो. येथे सूचकता बोराड्यांच्या भाषेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य दिसून येते. सूचक भाषाशैलीच्या वापरामुळे कथेला भारदस्तपणा येतो. अशी सूचक भाषाशैली ह्या कथेतून वापरतात.

ग्रामीण परिसरातील शब्दही आपल्या संस्कृतीच्या गुणधर्मासह येत असल्यामुळे येथील निवेदन येथील निर्माण होणाऱ्या प्रसंगाला हातभार लावणारे होते. विनोदी निवेदने विनोद फुलविण्यास, तर कारूण्यमय निवेदने कारूण्यमयता समजवण्यास हातभार लावताना दिसतात. एकूण त्यांची भाषा ही त्यांच्या निवेदन सामर्थ्याचा एक आविष्काराच आहे. त्यांच्या निवेदनाची भाषा रूढ संकेत झुगारून देऊन जे सागायचे आहे, त्यास थेटपणे भिडणारी अशी तर आहेच; पण कधीकधी ही भाषा सहजपणे प्रतिमांच्या पातळीवरही जाते. त्यामुळे बोराडे ह्यांचे निवेदन अनेक ठिकाणी प्रतिमानिर्मितीच्या पातळीवर, तसेच दृष्टांतसदृश रचनेच्या पातळीवरही जाते. त्यामुळे त्यांच्या कथेतील निवेदन व भाषाशैली अतिशय प्रभावी होऊन जाते. 'पडझड' ह्या कथेतील पावसाचे हे वर्णन पहा: "आभाळाला भोक पडल्यावानी झालं होतं. दाभणाच्या टोकावानी धारा गळत होत्या. गावातल्या रस्त्यात पाणी मावत नव्हतं, रस्त्यात न मावनारं पाणी मुसंडी मारल्यावाणी घरात शिरत होतं. सबंध गाव पाण्यात उभंअसल्यावाणी वाटत होतं. गोविदानं बसल्याबसल्याच हात लांबविला. घराचंदार किंचित किलकिलं केलं. त्या बरोबर सपकारा मारावा, तसं थंडगार बोचरं वारं पावसाच्या टपोऱ्या थेंबासह घरात शिरलं. सरसी गोविंदानं दार लावून घेतलं."[१८] ह्या वर्णनातील काही शब्द प्रतिमा प्रदेशविशिष्ट वाटतात.

त्यामुळे त्यांच्या कथेतील निवेदने अतिशय प्रभावी होऊन जातात. अर्थात् हे असे होत असताना त्याचे साधेपण, सरळपण जिवंत असते. ते केवळ भाषाशैलीमुळेच, हे येथे महत्त्वाचे आहे.

रा. रं. बोराडयांच्या संवादाची भाषा मात्र संपूर्णत: ग्रामीणच असते. तसेच संवाद स्वाभाविक आणि त्या त्या व्यक्तीची मन:स्थिती आणि प्रेरणा स्पष्ट करणारे किंवा घटना साकार करणारे असे असतात. शिवाय काही निवेदने खटकेबाज संवाद व चमत्कारिक पेचप्रसंगातून, तसेच चित्ताकर्षक संघर्षाच्या चित्रणातून, तर काही विशिष्ट बोलीतून ते कुठलेही अनुभव नेमके हेरून त्यातील नाटय ते टोकदारपणे व्यक्त करतात. ह्या प्रकारच्या निवेदनतंत्राच्या व भाषाशैलीच्या वापरामुळे 'तोल' ह्या कथेतील नाटयात्मक संवाद विशेष लक्षणीय ठरतात. पहा:

"कुणी घरात हाय का?"

आवाज पुरूषी होता. आपल्या नवऱ्याला रोजंदारीनं कुणी बोलवायला आलं असावं, असं तिला वाटलं. तिनं डोक्यावरचा पदर नीटनेटका घेतला आणि ती दाराच्या तोंडाशी आली दारात गायकवाडच्या संपतला बघताच ती दचकलीचं. घाईघाईनं त्याला म्हणाली,

"ते घरात न्हाईत, भाईर गेलेत."

तिच्याकडं बघत संपत गुळचट हसला. म्हणाला,

"म्या तुमच्या कडंच आलतो."

"का?"

"मळयात खुरपायचं काम व्हतं."

"तुमी बाजयाला सांगा, म्या तिच्या टुप्यत हाव. टुप्यातल्या बायका बरं म्या यीन." तो पुन्हा गुळचट हसला. तिला नजरेनं लपेटून घेत म्हणाला," मला टुप्पा नगं. तुमी एकल्याच फायजी."[१९] अशा प्रकरचा 'तोल' मधील संपत आणि रोजंदारीने जाणारी एक स्त्री ह्यांच्यामधील हा संवाद, ही भाषाशैली तो प्रसंग वाचकांच्या डोळयांसमोर उभा करतात. म्हणून चित्रमय व नाट्यात्मक प्रतिमानिर्मितीची ताकद बोराडे ह्यांच्या भाषाशैलीत आढळून येते. त्यांच्या भाषाशैलीचा हा खास विशेष होय.

रा. रं. बोराडे ह्यांच्या कथाविश्वाची व्यापकता पाहता, त्यांच्या प्रयोगशील व्यक्तिमत्त्वाची अभिव्यक्ती सदैव आपल्यासमोर उभी राहते. निवेदनाच्या भाषेच्या वास्तवाकलनाच्या, मनोविश्लेषणाच्या आणि अनुभवाकडे पाहण्याच्या दृष्टीसंदर्भात बोराडे सतत प्रयोग करीत आले आहेत, असे लक्षात येते. रूळलेल्या आणि मळलेल्या वाटा नाकारून सतत नव्या वाटा निर्माण करणारे लेखक

म्हणून बोराडे ह्यांचा उल्लेख करावा लागतो. बदलत्या ग्रामवास्तवाच्या जीवनचित्रणात बोराडयांच्या लेखणीला भरभरून यश मिळालेल दिसून येते ह्याचे कारण भाषा हे होय. भाषा म्हणजे केवळ खुणा नव्हे, तर एका विशिष्ट संस्कृतीची भावस्पंदने आणि संवेदना ती प्रकट करत असते. त्यामुळे त्यांच्या भाषाशैलीत विशिष्ट सांस्कृतिक वातावरण आढळते व भाषेची उस्मानाबादी हेलकारिता त्यांच्या कथांमधून दिसून येते.

बोराड्यांच्या कथेची भाषाशैली व्यक्तिरेखांना अनुरूप अशा भाषेचाच प्रत्येय देते. त्यांच्या ह्या सगळया व्यक्तिरेखा मध्यमवर्गातून आणि विशिष्ट अशा सांस्कृतिक वातावरणातून आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या वयानुसार व वृत्तीप्रवृत्तीनुसार ही भाषा अवतरते. मराठवाडी भाषेचा बाज घेऊन अवतरणारी त्यांची भाषा प्रगल्भ वाटते. तिला आशयाचा वेगळाच साज चढतो. व्यक्तिरेखांचे भावविश्व, विचार, चिंतन आणि त्या त्या व्यक्तिरेखेचे व्यक्तिमत्व डोळ्यापुढे साकार करणारी भाषा उस्मानबादी हेलकारिता कुठेच सोडत नाही.

अनुभवाच्या अधिकाअधिक जवळ जाण्याच्या हेतूने बोराडे ह्यांनी वेगळयाच भाषेची घडण केली. ती कृत्रिम वाटत नाही, हेच तिचे खास वैशिष्टय होय. बोलीभाषेतील अस्सल व प्रत्ययकारी शब्द बोराडे अतिशय प्रभावी रीतीने योजतात. उन्हाची वर्णने पहा:

"उन्हाचा चपका वाढला होतो. पाण्यावर वरंग नाचावेत, तशा झळा नाचत होत्या. उघडया अंगाला चपाचप चकपकाऱ्या मारत होत्या. रसरसलेल्या 'आरासमोर' बसावं, तसं वाटत होतं विसावलेलं वार थोडं हलावं, तापलेल्या अंगाला शीतलाई यावी, असं सारखं वाटत होतं. पण काही केल्या वारा हलत नव्हता. खालून जमीन आकटी सारखी फुलली होती. वरून हवा तापली होती आणि या दोन्हीच्या सपाटयात माणूस नुसता शिजून निघत होता."[२०] येथे 'आरा' ह्या अस्सल मराठी शब्दाची योजना ते 'विस्तव' ह्या शब्दासाठी करतात. ह्या आणि अशा अनेक वाक्यावाक्यांमधून ग्रामीण बोलीचे अस्सल रूप समोर येते. ग्रामीण विश्व, ग्रामीण माणसाचे अंतर्मन हे ह्याच शब्दांच्या माध्यमातून अधिक उत्कटपणे प्रकट होऊ शकते. बोराड्यांच्या कथांमधून असे अनेक पदरी शब्द, वाक्ये वापरली जातात. कृषिसंस्कृतीतील आणि ग्रामीण भागातील विविध व्यवसायातील शब्द ही सहजपणे त्यांच्या भाषेत एक वैभवाचे लेणे घेऊन येतात. उदा: 'इर्जिक', 'इरवाड', 'गोरं', 'आगोटी', 'वावरी', 'रोजंदारी', 'कुनबाट', 'रासन', 'फरांडी', 'कोळपी', 'खुरपी' इ. हे शब्द कृषिजीवनातील विविध घटकांचे प्रतिनिधित्व करताना दिसतात. येथे खऱ्या अर्थाने मराठी भाषेचा बाज बोराड्यांच्या कथांनी राखलेला दिसतो. त्यामुळे बोराडे ह्यांच्या कथेतील वास्तवाच्या प्रत्ययकारितेत भर पडलेली दिसते.

रा. रं. बोराडे ह्यांची भाषा आणि संवाद स्वतंत्रपणे लक्षात घेण्यासारखा विषय आहे. मराठवाड्यातील ग्रामीण बोलीच्या विविध रूपाची ते सहजपणे योजना करतात. जातिभेद, लिंगभेद आणि प्रसंगभेद असे संदर्भ घेऊनच त्यांची भाषा साकारलेली दिसते. उच्चवर्णीय व मध्यमवर्गीय ह्यांची भाषा पाहता उच्चवर्णीय हे भाषांचे नागरपण जोपासताना दिसतात, तर मध्यमवर्गीय भाषेचा मराठमोळेपणा, तिचे अस्सलपण जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करतात. तसेच पुरूषांची भाषा व स्त्रियांची भाषा पाहता, पुरूषांची भाषा रांगडी, दमदार, रूबाबदार व डैलदार दिसते; तर स्त्रिया आपल्या भाषेचा अस्सल गावरान नाजुकपणा, मृदुता, मुलायमता व कोमलपणा जोपासताना दिसतात. प्रदेशवैशिष्टय पाहिले, तर दर दहा मैलांवर भाषा बदलते. उदा. पश्चिम महाराष्ट्रातील 'मला', 'तुला' हे शब्द मराठवाड्यात 'मले', 'तुले' तर कोकणात 'माका', 'तुका' असे येतात. अशा प्रकारची प्रदेशविशिष्टता बोराड्यांच्या बोलीतून जपलेली दिसते.

विशिष्ट प्रदेश, सामाजिक स्तर, भावनेची उत्कटता आणि सांस्कृतिक परंपरेची सहजता ही म्हणी, वाक्प्रचार व आलंकारिकता ह्यांच्यामधून साकारत जाते. बोराड्यांच्या भाषेचा एक विशेष असा की, त्यांच्या भाषेला आणि संवादलेखनाला एक स्वाभाविक नाटयमयता लाभलेली दिसते. विशेषत: स्त्रियांचे संवाद लक्षात घेण्या सारखे आहेत.पहा:

मारुतीनं मनात विचार केला व अंधारात अस्पष्ट दिसणाऱ्या आकृतीला त्यांनं विचारलं,

''कोन हाय?''

''मी एक बाई हाय,दादा.''

''काय फायजी तुमाला.?''

''भिऊ नका, दादा. मी कुनी आशी तशी बाई न्हाई. थोरामोठयांच्या घरातील बाई हाय मी.'' आणि मारुती बोलत नाही, असं पाहून तिनंच परत विचारलं, ''खंडापूरची हाय न्हाय गाडी?'' मारुती चव्हाण बोलून गेला, ''व्हय.'' ''लई अडचनीत हाय मी, दादा. एवढा हातभार लावा. कसंबी करून तुमच्या गावापतवर न्या मला.''[२१] अशा संवादातून स्त्रीची दयनीय व असाहाय्य अवस्था तर व्यक्त होतेच, शिवाय मराठवाडी वळण व उस्मानबादी हेरकारिता ह्याही गोष्टी व्यक्त होतात. खरे तर भाषा हेच ग्रामीण साहित्याचे मोठे बळ आहे. ग्रामीण संस्कृतीचा तो खरा दस्तऐवज आहे. त्यामुळे बदलत जाणारे भाषिक संदर्भही त्या त्या अनुभवाबरोबरच बदलत जातात. रा. रं. बोराडे ह्यांच्या कथेने भाषा आणि जीवन ह्यांचा खरा तोल आजपर्यंत राखून ठेवलेला, जपलेला व जोपासलेला आहे, असे म्हणावयाचे ते ह्यासाठीच.

बोराडयांच्या कथालेखनामध्ये भाषाशैलीएवढेच निवेदनतंत्रालादेखील महत्त्वपूर्ण स्थान आहे. हे निवेदन कधी नागर भाषेत, तर कधी बोलीभाषेत केले जाते. निवेदनतंत्राच्या साहाय्यानेच कथेतील वास्तव घटनांचे रेखाटन केले जाते. काही वेळा व्यक्तीच्या भावभावना टिपण्यासाठी विशिष्ट निवेदनतंत्राचा वापर बोराडे कथेतून करतात. प्रामुख्याने वास्तवरेखाटनासाठी बोराडे ज्या निवेदनतंत्रचा अवलंब करतात, त्या निवेदनतंत्राचे स्वरूप साधारण: पुढीलप्रमाणे असते: वास्तवरेखाटनासाठी ते जे निवेदन करतात, त्यासाठी ते भूतकाळवाचक क्रियापदांची योजना करतात. घटना, प्रसंग, संवाद चालू वर्तमानकाळाच्या क्रियापदांनी साकार करतात. वास्तवरेखाटनासाठी भूतकाळवाचक क्रियापदांची योजना करण्याचा परिणाम असा होतो की, कथांतर्गत व्यक्ती, घटना - प्रसंग ह्यांच्याशी कथेतील वास्तवाचे समकालीनत्वाचे नाते खंडीत होते. व्यक्ति, घटना - प्रसंग आणि कथांतर्गत वास्तव ह्यांच्यामध्ये कलादृष्टया आंतर पडते व वास्तव भूतकाळाच्या चौकटीत स्थिर होते.

'सत्यानाश' ह्या कथेतील वास्तवतेचे निवेदन जरी भूतकाळवाचक क्रियापदातून केले जात असले, तरीही हे वास्तव भूतकाळाच्या चौकटीत बध्द होऊन स्थितिशील होत नाही, तर बाबालाल सारख्या सरंजामदाराने मारुन - मारुन मरणासन्न झालेल्या वासराच्या वेदनेशी ह्या वास्तवाचे गतिमान आणि द्वंद्वात्मक नाते प्रस्तापित होते.[२२] मरणासन्न झाल्याने होणाऱ्या वेदनांचा आणि ढवळून निघालेल्या रंगरावच्या कुटंबियांचे दु:ख ह्यांचा अनुभव भूत - वर्तमानकाळाच्या काळविषयक चौकटीला छेद देऊन कालातीत स्तरावर जातो. कथेतून चित्रित होणाऱ्या 'कुसळी गोंडवळीनं भरलेल्या माळाचं, गावाच्या रोखानं जाणारी गुरं, बाभळीची झाडं', इत्यादी वास्तवपूर्ण घटकांमुळे ह्या अनुभवाचे ग्रामीण संदर्भसूत्र कायम राहते.

निवेदनकौशल्य आणि भाषाशैली ह्यांचा विचार करता असे जाणवते की, निवेदनातील गतिमानता, कथावस्तूवर जबरदस्त पकड, आटोपशीरपणा, स्वाभाविक विकास, नवनवे ग्रामीण शब्द वापरण्याची कलापूर्ण लकब, संवादावर विशेष भर, आटोपशीर मराठवाडी बोलीची प्रतीती देणारी संवादरचना, ग्रामीण बोलीचा नेटका, नेमका व कलात्मक वापर ह्यामुळे आशय, अभिव्यक्ती आणि भाषा हे सर्व घटक एकजीव झाल्यासारखे वाटतात. त्यामुळे भाषेत चित्रात्मकता आलेली आहे. निवेदनातील सौम्यता अनेकदा विलोभनीय व परिणामकारक जाणवते. प्रतिमांचा आणि प्रतीकांचा कथाकाराने केलेला वापर सखोल, अर्थपूर्ण व परिणामकारकता वाढविणारा असल्याने वापरलेल्या सर्व प्रतिमा अगदी अस्सल ग्रामीण आहेत. उदाहरण म्हणून काही प्रतिमा पहा: ''ढेकळाखालीकोंब दाबावा, तसं मन दाबलेलं,'' ''राखेतल्या इस्तवावानी'', ''पिकाच्या बुडाला खळाखळा खुरपं फिरवावा तसं'', ''वाळूचा कट्टा फुटल्यावानी झालं मला'', ''बांध फुटल्यागत तिला रडू कोसळलं.''[२३] ह्या सारख्या

प्रतिमांमुळे निवेदनाला खास ग्रामीण स्पर्शप्राप्त झाल्याचे दिसून येते. येथे बोराड्यांची भाषा निवेदनाच्या दृष्टीने सरस व उत्कृष्ट ठरते व त्या भाषेने, निवेदनाने एक वेगळीच उंची गाठलेली जाणवते.

खेडयात राहणाऱ्या सामान्य माणसांची वेगवेगळ्या कारणांमुळे होणारी घुसमट हे रा. रं. बोराड्यांच्या कथालेखनाचे प्रधान आशयसूत्र होय. कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अशा अनेक स्तरांवर हे आशयसूत्र निवेदनकौशल्याच्या जोमदारपणाने मांडले आहे. त्यासाठी त्यांनी मराठवाड्याची बोलीभाषा अत्यंत प्रतिभासंपन्नतेने आणि कौशल्याने वापरली आहे.

रा. रं. बोराड्यांच्या भाषाशैलीमध्ये पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण कथाकारांशी तुलना करता फारसा वेगळेपणा आढळत नसला, तरी त्यांनी आणलेले कथेतील संवाद आणि ह्या संवादातून केलेला ग्रामीण भाषेचा वापर ह्यामुळे कथावास्तूचा उत्तम परिपोष त्यांच्या कथेत झालेला दिसतो. निवेदनशैली खास वैशिष्टयाने नटलेली असल्याने कथेतील अनुभव ज्या निवेदन शैलीतून प्रकट होतो, त्या निवेदनशैलीची स्वतंत्रपणे आपण चव घेत असल्याने त्यांच्या कथेत ह्या निवेदनाला एक स्वतंत्र मूल्यप्राप्त होते. तसेच केवळ गंमत म्हणून कथेत आलेल्या ग्रामीण भाषेपासून तो आशयाशी झोंबी घेत राहणाऱ्या भाषेपर्यंत ग्रामीण कथेतील भाषेचे स्वरूप आपण पाहिले. ह्या भाषेने ग्रामीण कथा अधिक कलात्मक कशी बनवली, ह्याचेही आकलन होण्यास ह्या प्रकरणातील विवेचन मदत करेल.

## ४.४ . समारोप :

रा. रं. बोराडे ह्यांच्या 'पेरणी' (१९६२) व 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या दोन कथासंग्रहांमधील वातावरणनिर्मितीचा विवेचनात्मक अभ्यास केल्यानंतर कथेच्या उभारणीसाठी आवश्यक असणारी वातावरणनिर्मिती घडविण्यात बोराड्यांची लेखणी समर्थ ठरली आहे, हे लक्षात येते. स्थळ काळाला अनुरूप अशा विविध वातावरणामुळे कथेच्या दृष्टीने अनेक हेतू साध्य झालेले आहेत. एकंदर कथेच्या घटकांमध्ये वातावरणनिर्मितीला असलेले महत्त्व लक्षात येते.

बोराडयांच्या कथालेखनाची परिणामकारकता जशी जीवनानुभवातून आली आहे, तशीच ती त्यांच्या निवेदनतंत्रामुळे व लेखनशैलीतील कलापूर्ण घटकामुळेपण आलेली दिसून येते. एखादा प्रसंग किंवा एखादी व्यक्तिरेखा बोराडे प्रभावीपणे उभी करतात ते केवळ स्वत:जवळील शब्द सामर्थ्यावरच. तो प्रसंग किंवा ती व्यक्तिरेखा उभी करताना ते शब्दांचा वापर एवढया प्रभावीपणे करतात की, तो प्रसंग किंवा ती व्यक्तिरेखा प्रत्यक्ष वाचकांना आपल्या अंतरंगातले भाव उलगडून सांगते आहे, असे वाटते.

निवेदनातील सहजता व ओघवती भाषाशैली हे रा. रं. बोराडयांच्या कथालेखनाचे खास असे वैशिष्टय आहे. एखादा प्रसंग असो की व्यक्तिरेखा, ते तो प्रसंग किंवा ती व्यक्तिरेखा वाचकासमोर छोटयाछोटया वाक्यांनी व संवादाच्या माध्यमातून उभी करतात, हे त्यांच्या भाषाशैलीचे खास उलेखनीय

असेच कौशल्य आहे.उदाहरण म्हणून, ''हुरडा'' ह्या कथेतील बाजीचे व्यक्तिचित्रण पाहण्याजोगे आहे.[२४]

बाजीच्या तोंडून छोटीछोटी वाक्ये बोराडे वदवून घेतात आणि ह्या छोटयाछोटया वाक्यातून बाजीच्या मनाची घुसमट सांगण्यात रंगून जातात. येथे ह्या वातावरणाच्या माध्यमातून बोराडे ह्यांच्या निवेदनकौशल्याचे एक वेगळे अंग दिसून येते. वक्तृत्वगुणामुळे त्यात ओघवतेपणा तर येतोच,पण कधीकधी कथेचा आवेशही प्रकटताना दिसतो.

अशा प्रकारे वातावरण, अस्सल गावरान व मराठमोळेपण जपणारी बोली व वाक्प्रचार ह्यांचा उपयोग बोराड्यांच्या लेखनशैलीला व निवेदनपध्दतीला प्रभावी स्वरूप देतो. त्यांची लेखनशैली प्रभावी, चित्रमय, साधी, सोपी व सहज सुंदर अशी आहे; तर निवेदने प्रथमपुरूषी किंवा आत्मसंवादात्मक आणि तृतीयपुरूषी व उस्फूर्त स्वरूपाची असलेली जाणवतात. लेखनशैलीचा व निवेदनकौशल्याचा वापर करताना त्यांनी वापरलेले शब्द त्या त्या प्रदेशापर्यंत, घटकांपर्यंत वाचकांना नेतात. जसे, 'औतकाटी', 'वाफसा', 'इर्जिक', 'बाटूक', 'परभाऱ्या', 'मायंदळं', 'दिरंग', 'कळवंड', 'चावरीथंडी', 'खाल्तं', 'वरतं', 'राकीस', 'गंगमुख', 'विंचू', 'गावंदरी' व 'पानंद' इ. प्रासंगिक नाटय व भावप्रवाह प्रकट करण्याचे बोराड्यांचे कौशल्य वरीलप्रमाणे वेगवेगळ्या घटकांमधून व्यक्त होते. त्यांच्या लेखनशैलीचे व निवेदनकौशल्याच्या प्रभावीपणाचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे कथाविषयाशी त्यांची होणारी समरसता हे होय.

----------: ❁❁❁❁❁ :----------

## संदर्भ व टीपा:

*(जेथे आवृत्तीचा उल्लेख नाही, तेथे प्रथमावृत्ती समजावी.)*


१. कुळकर्णी वा. ल, ''जिवंत रेखीव कथा'','आलोचना', मुंबई, ऑक्टोबर १९६७, पृ.३४.

२. बोराडे रा. रं., ''खानदान'', 'पेरणी', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे,१९६२,पृ.१३१.

३. तत्रैव, ''काळीज'', ' कणसं आणि कडबा ', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९४, पृ. ३८

४. तत्रैव, ''वेस'', तत्रैव, पृ. ९२

५. तत्रैव, '' पोतोरा'', तत्रैव, पृ. १४३

६. तत्रैव, '' झाड'', ''पेरणी'', उनि. , पृ. १३७

७. तत्रैव, ''सांगावा'' तत्रैव, पृ. ५७

८. तत्रैव, ''अभ्यास'', तत्रैव, पृ. ९७

९. पहा: तत्रैव, ''सत्यानाश'', तत्रैव, पृ. ८५-९१

१०. पहा: तत्रैव, '' कणसं आणि कडबा '', उनि., पृ. ९९-१०७

११. नेमाडे भालचंद्र, '' कादंबरी'', 'वाङ्मयीन शैली आणि तंत्र', हातकणंगलेकर म.द. (संपा.), अभिजात प्रकाशन, पुणे, १९८१, पृ. १३९

१२. कुरुंदकर नरहर, ''प्रस्तावना'', 'वानवळा' (बोराडयांच्या निवडक कथांचा संग्रह), कुरुंदकर नरहर (संपा.), अमेय प्रकाशन, नागपूर, १९७९,पृ. १६

१३. पहा: बोराडे रा. रं., ''बोचकं'', 'कणसं आणि कडबा' उनि., पृ. ७ - १४

१४. तत्रैव, ''सत्यानाश'', 'पेरणी', उनि., पृ. ८६

१५. पहा: यादव आनंद, ''ग्रार्मीण साहित्याची भाषा'', 'ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृत्ती: १९९३, पृ. ९२

१६. पहा: बोराडे रा. रं., ''अवर्षण'', 'कणसं आणि कडबा ', उनि., पृ. ९३ - ९७

१७. तत्रैव, पृ. ९८

१८. तत्रैव, ''पडझड'', 'कणसं आणि कडबा ', तत्रैव,पृ. १३९

१९. तत्रैव, ''तोल'', तत्रैव, पृ. ४७ - ४८

२०. तत्रैव, ''अवर्षण'', तत्रैव, पृ. ९३ - ९४

२१. तत्रैव, ''बलामत'', 'पेरणी', उनि., पृ. २१ - २२

२२. पहा: तत्रैव, ''सत्यानाश'', तत्रैव,पृ. ८५ - ९१

२३. पहा: तत्रैव, ''तोल'', 'कणसं आणि कडबा ', उनि., पृ. ४६ - ४९

२४. पहा: तत्रैव, ''हुरडा'', 'पेरणी ', उनि., पृ. ६१ - ६५

----------: ❋❋❋❋❋ :----------